(पान १ वरुन) दिवाळीतील एसटीची...

होणारी अतिरिक्त रक्कम मिळणार नाही. भाडेवाढीमुळे राज्यातील नागरिकांचा एसटीचा लांब पल्याचा प्रवास महागणार होता. आता मात्र त्यांना या निर्णयाचा फायदा मिळणार आहे.

दिवाळीच्या सुट्यांमध्ये अनेक कुटुंबे गावी, पर्यटनस्थळांना भेटी देण्याचे बेत आखतात. दिवाळीला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे होणारी गर्दी लक्षात घेऊन महामंडळ दरवर्षी जादा गाड्यांची घोषणा करते. दिवाळी आणि उन्हाळी हंगामातील गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ करत असते. महामंडळाच्या धोरणानुसार गर्दीच्या हंगामात भाडेवाढ करण्याचा अधिकार राज्य परिवहन गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ केली जात असते, त्या प्रमाणं या वर्षी देखील निर्णय घेण्यात आला होता. आता तो निर्णय रद्द करण्यात आला आहे.

यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यासंदर्भातील परिपत्रक जारी करण्यात आलं होतं. एसटीची प्रस्तावित १० टक्के भाडेवाढ विठाई, शिवशाही, निमआराम बसेससाठी लागू होती. मात्र, ती भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. मुंबई ते पुणे मार्गावर शिवनेरीकरीता भाडेवाढ लागू करण्यात आलेली नव्हती.

सध्या दिवसाला सुमारे २३ ते २४ कोटी रुपयांचे प्रवासी उत्पन्न महामंडळाला मिळते. हंगामी भाडेवाढीमुळे दिवसाचे उत्पन्न ६ कोटी रुपयांनी वाढण्याची शक्यता होती. त्यामुळे महिन्याभरात महामंडळाला ९५० ते एक हजार कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, सध्या घेण्यात आलेल्या सध्या महिन्याला ८५० कोटी रुपये महामंडळाला उत्पन्न मिळते.

दिवाळीमधील सणांच्या काळात सर्वसामान्य प्रवासी एसटीला प्राधान्य देत असतात. १० टक्के हंगामी भाडेवाढ केल्यानं प्रवाशांना आर्थिक फटका सहन करावा लागतो. मात्र, यंदा एसटीच्या निर्णयामुळं प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

(पान १ वरुन) जागा वाटपाच्या...

राहिलं आहे. लोकसभा निवडणुकीवेळी महायुतीत जागावाटपाचं गुऱ्हाळ शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होतं. त्यामुळे अनेक मतदारसंघांमध्ये महायुतीच्या उमेदवाराची घोषणा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात झाली. याचा मोठा फटका लोकसभेवेळी महायुतीला बसला आणि विरोधकांच्या महाविकास आघाडीने चांगलीच मुसंडी मारत राज्यात ४८ पैकी ३१ जागा जिंकल्या. याची पुनरावृत्ती विधानसभेत होऊ नये, यासाठी महायुतीकडून हालचाली सुरू असून मागील काही दिवसांत जागावाटप निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत अनेक बैठका पार पडल्या आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होण्याआधीच जागावाटप जाहीर करून मित्रपक्षांतील संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न महायुतीच्या नेत्यांकडून होऊ शकतो.

मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्याबाबत निर्णय होणार?

भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे तीन पक्ष पहिल्यांदाच विधानसभा निवडणुकीला एकत्रितपणे सामोरे जात आहेत. त्यामुळे निवडणुकीनंतर नक्की कोण मुख्यमंत्री होणार, याबाबत सस्पेन्स आहे. महाविकास आघाडीत मुख्यमंत्रिपदावरून संघर्ष सुरू असताना महायुतीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करून आघाडी घेतली जाते का, हे पाहणंही महत्त्वाचं ठरणार आहे.

महाविकास आघाडीच्या आरोपांना प्रत्युत्तर

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह इतर नेत्यांनी काल घेतलेल्या पत्रकार परिषदेतून महायुतीवर अनेक गंभीर आरोप केले. या आरोपांना उद्याच्या पत्रकार परिषदेतून उत्तर देण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

(पान १२ वरुन) अमरावती ग्रामीण...

पोलीस स्टेशनला प्रलंबित असलेले पकड वॉरंट मधील एकुण ७ आरोपीतांना अटक करण्यात आली असुन एकुण १२ जमानती वॉरंट व ९ समंन्स बजावणी करण्यात आली. ऑल आउट ऑपरेशन दरम्यान शस्त्र अधिनियमान्वये एकुण १ आरोपींवर कारवाई करून जेरबंद करण्यात आले आहे. तसेच नाकाबंदी दरम्यान ५४ वाहनांवर कार्यवाही करण्यात आली. अवैध धंदयांवर करण्यात आलेल्या कार्यवाही दरम्यान अवैध दारु विरुध्द एकुण ८ केसेस करुन २४,३२०रूपयाचा मुद्देमाल, पो.स्टे. मोशी, शिरजगाव कसबा व स्थानीक गुन्हे शाखा मिळून रेती चोरी कारवाईच्या एकूण ३ केसेस मध्ये १६,२०,००० रूपयाचा तसेच पोस्टे येवदा वेचे गोवंश अनुषंगाने एकुण १ केस करुन ३१,५०० रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर मोहीमेदरम्यान अमरावती ग्रामीण पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर अधिक्षक पंकज कुमावत, सर्व पोलीस उप अधिक्षक तसेच सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी असे एकूण ४४ पोलीस अधिकारी व २०१ पोलीस अमंलदार यांनी सक्रीय सहभाग घेतला होता.

(पान १२ वरुन) जुन्या कर आकारणीनुसार...

पद्धतीने कराची देयके राहणार आहे.

तरी सर्व मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरून अमरावती महानगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन अमरावती महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

(पान १२ वरुन) चोरी प्रकरणातील...

सागर पाटील, गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे शिवाजी बचाटे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली, निरीक्षक बाबाराव अवचार, यांचे नेतृत्वाखाली युनिट २ चे सपोनि महेश इंगोले, पोउपनि संजय वानखडे, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, गजानन ठेवले, आस्तीक देशमूख, संग्राम भोजने, नईम बेग, मंगेश शिंदे, राजीक रायलीवाले, वेतन कराडे, योगेश पवार, निलेश वंजारी, सागर ठाकरे, संदीप ठांडारे, वेतन शर्मा, राहुल दूधे यांनी केली आहे.

(पान १२ वरुन) नवनीत राणा यांना...

करण्यात आली आहे. राज्यातील माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची नुकतीच मुंबई येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. राज्यभर वातावरण तापले असतांना नवनीत राणांना धमकीचे पत्र मिळाल्याने पोलीसांनी सदर प्रकरणाचा तपास करून खरा सूत्रधार शोधावा अशी मागणी करण्यात आली आहे.

(पान १२ वरुन) पसार आरोपींना...

पसार आरोपी अटक करणे संबंधाने वेळोवेळी विशेष मोहीम राबवून माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर पो.स्टे मोर्शी हद्दीतील तसेच मध्य प्रदेश राज्यातील एकुण ७६ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक़ विशाल आनंद, अपर अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकरण, निरीक्षक़ नितीन देशमुख यांचे मार्गदर्शनात डि.बी पथक प्रमुख पोउपनि अमोल बुरकुल, रवी तायडे, संतुलाल उईके, स्वप्नील बायस्कर, छत्रपती करपते व बिट अंमलदार यांनी केलेली आहे.

(पान १२ वरुन) १६ पासून झाडीपट्टी....

असे उपक्रम राज्यभर परिषदेमार्फत राबवले जात असतात. महोत्सवानिमित्त पहिल्यांदाच शहरात झाडीपट्टी नाट्य महोत्सव सुरू होणार आहे. भारत गणेशपुरे आणि प्रशांत दामले यांच्या उपस्थितीत तीन अंकी नाटकाने महोत्सवाची सुरुवात होणार आहे. नाट्य प्रयोगाचे आयोजन अभनाट्य परिषद मुंबई असून संयोजन अमरावती व नागपुर शाखेने केले आहे. रंगकर्मी रंगभूमी वडसा यांच्या गद्दार या नाटकाचे सादरीकरण होणार आहे. नाटकाचे दिग्दर्शन नरेश गडेकर यांनी केले आहे. लेखक आनंद भिमटे आहेत. यातील कलावंत अभिनेत्री आसावरी तिडके, अभिनेते देवेंद्र दोडके, देवेंद्र लुटे व नरेश गडेकर यांचेह बाल कलाकार गंधर्व नरेश गडेकर, अरविंद झाडे, झाडे आदींच्या यात भूमीका आहेत. पत्रपरिषदेला ॲड. मिलींद जोशी उपस्थित होते.

(पान १ वरुन) मुंबई टोलमुक्त...

५. आष्टी उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता (जलसंपदा)

६. वैजापूरच्या शनीदेवगाव बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता (जलसंपदा विभाग)

७. राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित (महसूल)

८. पाचपाखाडी येथील जमीन ठाणे मनपास प्रशासकीय भवनासाठी (महसूल)

९. खिडकाळी येथील जमीन हायब्रिड स्किल विद्यापीठासाठी विनामूल्य (महसूल)

१०. राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० राबविणार

११. पुणे मेट्रो रेल टप्पा-२ मधील रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता (नगर विकास)

१२. किल्लारीच्या शेतकरी सहकारी कारखान्याचे कर्ज व्याजासह माफ (सहकार)

१३. अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ (सहकार)

१४. मिरजच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात इमर्जन्सी मेडिसिनची ३ पदे (वैद्यकीय शिक्षण)

१५. खंड क्षमापित झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना (वैद्यकीय शिक्षण)

१६. मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी पंधरवडा (मराठी भाषा)

१७. अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळासाठी अभ्यासगट

१८. उमेदसाठी अभ्यासगट (ग्राम विकास)

१९. कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव (कौशल्य विकास)

२०. दमण गंगा आणि गोदावरी नदी जोड प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

(पान १ वरुन) अभिनेते अतुल...

अंकाचं अनेकांनी भरभरुन कौतुक केलं होतं. इतकच नव्हे तर त्यांनी नुकतच सुर्याची पिल्ले या नाटकाचीही घोषणा केली होती. त्यामुळे अतुल परचुरे हे रंगभूमीवरुन पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासही सज्ज झाले होते.

जयवंत वाडकर यांना अश्रू अनावर

अभिनेते जयवंत वाडकर यांना ही बातमी ऐकून मोठा धक्का बसला. एबीपी माझाला प्रतिक्रिया देताना त्यांना अश्रू अनावर झाले. त्यांनी म्हटलं की,सूर्याची पिल्ले नाटाकाची तालीम सुरु होती.. पाच दिवसांपूर्वी त्याला पुन्हा त्रास होत होता म्हणून ॲडमिट करण्यात आलं. पण तो पुन्हा येईल असं वाटलं होतं. यावर काय बोलावं हेच सुचत नाहीये. नववीत असल्यापासून आम्ही एकत्र काम करतोय. तेव्हापासूनची आमची मैत्री होती. आमचा मित्र खूप लवकर गेलाय.

ही सहन करण्यासारखी गोष्ट नाही : अशोक सराफ

ही अत्यंत वाईट गोष्ट घडली आहे. मराठी सिनेसृष्टीच्या दृष्टीने अत्यंत वाईट गोष्ट घडली आहे. एक चांगला अभिनेता मराठी सिनेसृष्टीने गमावला आहे. ही सहन करण्यासारखी गोष्ट नाही. असं व्हायला नको होतं. फार छान नट, फार छान मुलगा होता. माझा अत्यंत जवळचा आणि आवडता मित्र होता. एका सिनेमात त्याने माझं लहानपण केलं होतं आणि हे मी विसरुच शकत नाही, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी एबीपी माझाला दिली आहे.

अतुल परचुरे हे अनेक दिवसांपासून कर्करोगाशी झुंजत होते. पण या सगळ्यावर मात करत पुन्हा एकदा रंगभूमीवर एक दमदार प्रवेश करण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. त्यासाठी त्यांनी सुर्याची पिल्ले या नाटकाची निवडही केली होती. पण काही दिवसांपूर्वी त्यांची प्रकृती पुन्हा खालावली. पण आता अतुल परचुरे यांनी जगाचा निरोप घेतला असून एक हरहुन्नरी कलाकार मराठी सिनेसृष्टीने गमावला असल्याची भावना प्रत्येकाची आहे.

(पान १ वरुन) पेंच नदीच्या...

त्यामुळे विद्यार्थ्यांनी पेंच नदीच्या कालव्यावर फिरायला जाण्याचा बेत आखला.

दुपारी आठही विद्यार्थी फिरायला निघाले. ते साडेचार वाजता कालव्यावर पोहचले. तेथे पोहण्याचा मोह आवरला नाही. त्यामुळे आठही जण कालव्यात उतरले. मयंक मेश्राम, अनंत साबारे आणि मयूर बागरे यांना पोहणे येत नसतानाही ते खोल पाण्यात गेले. मनदीपने त्या तिघांना वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, मयूरने मनदीपचा हात पकडला. चारही मित्र वाहून जात असल्याचे बघून उर्वरित चौघे लगेच पाण्याबाहेर निघाले. त्यांनी मदतीसाठी आरडाओरड केली. मात्र, जंगल असल्यामुळे मदतीसाठी कुणीही आले नाही.

अग्निशमन दलाच्या जवानांकडून शोध

घाबरलेली चारही मुले वसतिगृहात परत आली. त्यांनी अधीक्षकांना माहिती दिली. त्यांनी लगेच रामटेकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आसाराम शेटे यांना माहिती दिली. ते ताफ्यासह कालव्यावर पोहचले. अग्निशमन दलाच्या जवानांची मदत घेतली.

चोवीस तासांत सहा मुलांचा बुडून मृत्यू

गेल्या चोवीस तासात पाण्यात बुडून सहा मुलांचा मृत्यू झाला. चार जणांचा पेंच कालव्यात तर दोघांचा मोहगाव झिल्पी तलावात बुडून मृत्यू झाला. फिरायला मोहगाव झिल्पी तलावावर गेलेल्या दोन मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. वीरसेन विठोबा गजभिये (१५, रा. शिवसुंदरनगर, दिघोरी) आणि गौरव लीलाधर बुरडे(१५, रा. रमणा मारोती) अशी या मुलांची नावे आहेत. शनिवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास ही घटना घडली.

(पान १ वरुन) उद्धव ठाकरे रिलायन्स....

रुग्णालयात दाखल झाले होते. यापूर्वी, उद्धव ठाकरे यांच्यावर २०१२ मध्ये ॲंजिओप्लास्टी करण्यात आली होती.

दसरा मेळाव्यातून घणाघाती प्रहार

दुसरीकडे, दोन दिवसांपूर्वी दसरा मेळाव्यातून घणाघाती प्रहार केला होता. काल सुद्धा त्यांनी महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेतून तोफ डागली होती. उद्धव ठाकरे यांनी सत्तेवर येताच धारावी पुनर्विकास प्रकल्पाची निविदा रद्द करू, असे म्हटले आहे. उद्योगपती गौतम अदानी यांच्या कंपनीला ही निविदा प्राप्त झाली आहे.

मुंबईतील दादर येथील शिवाजी पार्कवर शिवसेनेच्या पारंपरिक दसरा मेळाव्याला संबोधित करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, सरकार धारावीच्या माध्यमातून मुंबईला लुटण्याचा प्रयत्न करत आहे. अदानींना काय दिले नाही? सारी जमीन अदानींची होत आहे. मुंबई आम्हाला अदानीने दिलेली नाही. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत लढून आपण हे साध्य केले आहे. मी स्वतःसाठी लढत नाही. मी मुंबईसाठी लढत आहे. माझे सरकार येताच मी धारावीची निविदा रद्द करेन.

मुख्यमंत्रीपदाचा निर्णय ठरला?

दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून दिल्लीमध्ये काँग्रेस वार्तांकन करणारे पत्रकार आदेश रावल यांनी लोकमत हिंदीला दिलेल्या मुलाखतीमध्ये काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील मुख्यमंत्रीपदावर निर्णय घेतल्याचे म्हटले आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये उद्धव ठाकरे यांनी सहकुटुंब दिल्ली दौरा केला होता. या दौऱ्यामध्ये त्यांनी इंडिया आघाडीतील नेत्यांच्या भेटीगाठी केल्या होत्या. तसेच राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांची सुद्धा भेट घेतली होती. या दौऱ्यामध्ये उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी यांच्यामध्ये मुख्यमंत्रीपदावर चर्चा झाल्याचा दावा आदेश रावल यांनी केला आहे.

राहुल गांधी महाराष्ट्रात कोणत्याही बदलाच्या तयारीत नाहीत

राहुल गांधी सद्यस्थितीत महाराष्ट्रामध्ये कोणताही निर्णय किंवा बदल करू इच्छित नाहीत. त्यामुळे महाविकास आघाडीची राज्यात सत्ता आल्यास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेच असतील असंच राहुल गांधी यांनी उद्धव ठाकरे यांना सूचित केल्याचे त्यांचं म्हणणं आहे. दरम्यान, ठाकरे गटाकडून ही बाब जाहीरपणे सांगण्यात यावी आणि मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करावा अशी मागणी ठाकरे गटाकडून होत आहे. मात्र काँग्रेसला याला विरोध असल्याचा आदेश रावल यांनी म्हटले आहे.

चिखलदरा आयटीआयचे 'सिदो कान्हु मुर्मू' नामकरण

आ.राजकुमार पटेल यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण

अमरावती, दि. १० : चिखलदरा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे झारखंड मधील ब्रिटीश सरकार विरोधात क्रांती घडवून आणणारे थोर क्रांतीकारक 'सिदो कान्हु मुर्मू' असे नामकरण करण्यात आले आहे. याप्रसंगी नामांतर समारंभा निमित्त मेळघाट विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजकुमार पटेल यांच्या हस्ते नामांतर फलकाचे अणावरण करण्यात आले.

यावेळी माजी पंचायत समिती सभापती बंशीलाल जामकर, माजी सदस्य कालु अखंडे, ज्येष्ठ पत्रकार अश्रफभाई, आयटीआचे प्राचार्य डी. ओ. देशमुख, गट निदेशक संजय मारसेटवार यांच्यासह संस्थेचे अधिकारी कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

आमदार श्री. पटेल म्हणाले की, थोर विभूतींचे नाव संस्थेला दिल्यामुळे महान व्यक्तींचा जीवन परिचय विद्यार्थ्यांना होतो. युवा पिढीला त्यांच्या जीवनचरित्र, विचारांतून प्रेरणा मिळते, असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले.

'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुलमंत्राचा अंगिकार करुन संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिकून आई-वडील, गुरूजन व संस्थेचे नाव रोषण करावे, असे श्री. जामकर यांनी मनोगत व्यक्त केले.

संस्थेचे प्राचार्य श्री. देशमुख यांनी नामांतराची रुपरेषा, शासनाचे त्यामागचे धोरण आणि थोर क्रांतीकारक सिदो कान्हु मुर्मू यांचा जीवन परिचय आदी संदर्भात माहिती दिली. ते म्हणाले की, शासन उद्योगांना गरज असलेले मनुष्यबळ तयार करण्यासाठी अभ्यासक्रम तयार करीत आहे. त्यानुसार प्रशिक्षित मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. आयटीआयमध्ये येणारा तरुण हा प्रामुख्याने गरजू असतो. त्याच्या ज्ञानासोबत त्याला आर्थिक सुबत्ता मिळावी, यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. प्रत्येकाच्या हाताला काम मिळण्यासाठी विद्यार्थ्यांचा आयटीआयकडे कल वाढत आहे, असे श्री. देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल मस्के यांनी केले. सुत्र संचालन रुपेश डोंगरे यांनी तर गटनिदेशक श्री. मारसेटवार यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी संस्थेतील सर्व निदेशक व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

श्री देवनाथ मठाच्या दसरा महोत्सवाने दुमदुमली सुर्जी नगरी

अंजनगाव सुर्जी दि. १४ : येथील श्री देवनाथ मठाचा विजयादशमी महोत्सव दरवर्षीप्रमाणे दि.१२ ऑक्टोबर २०२४ रोजी थाटात संपन्न झाला. ३०० वर्षांची दिव्य परंपरा असलेल्या या ऐतिहासिक सोहळ्याचा भाग होण्यासाठी लोक गर्दी करत असतात.यानिमित्त सुर्जी परिसरात भव्य फेरी काढल्या जाते.ही फेरी देवनाथ मठ ते दसरा मैदान श्रीनाथ विद्यालय परिसर सुर्जी येथे दसरा मेळावा होत असतो या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर श्रीनाथ पीठाचे पिठाधिश आचार्य प.पु.श्री. जितेंद्रनाथ महाराज ,माजी नगराध्यक्ष मदनराव झाडे,माजी उपनगराध्यक्ष वैभव लेंधे ,रमेशजी मेठी, चंद्रकांत ढोरे,चंद्रशेखर शेळके, सावतराम वानखडे, सतीश वानखडे,गजानन लवटे (संचालक खविस.),उद्योजक प्रविण नेमाडे,जगदीश सारडा, कानुशेठ राठी,मुन्नाभाऊ ईसोकार (शिवसेना शहर प्रमुख) इ.मान्यवर उपस्थित होते.

दसरा मेळावा कार्यक्रम झाल्यानंतर परिसरातील नवदुर्गा मंडळांना भेटी देत सुर्जी येथील प्रसिद्ध मारोती मंदिर असा प्रवास करत असते.यावर्षी या फेरी मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मूर्ती व श्री देवनाथ दिव्यरथ विशेष आकर्षण ठरले. या रथातून प्रभू श्रीरामचंद्र हनुमंत यांच्या उत्सवमूर्ती दसरा मैदानावर नेण्यात येतात व तेथे श्रीनाथ पीठाचे पिठाधिश आचार्य प.पु.श्री. जितेंद्रनाथ महाराज यांच्या उपस्थतीत सीमोल्लंघन सोहळा पार पडतो.

या दसरा मैदानावर विविध प्रकारचे शौर्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात येतात.यामध्ये मल्लखांब, तलवारबाजी,लाठीकाठी,दांडपट्टा तसेच अग्निगोळ्यातुन उड्या,लेझीम पथक मुलांसह मुलीसुद्धा या प्रात्यक्षिकात भाग घेत असतात. विद्यार्थ्यांमध्ये श्रीनाथ वनबंधु छात्रावास व कन्या छात्रावास यांचा समावेश आहे. पारंपरिक शस्त्रपुजा,पालखीपूजन व श्रीगुरूजींचे आशीर्वचन यानंतर मिरवणूक माळीपुऱ्यातून देवनाथ मठाकडे प्रस्थान करते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विलास कविटकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीनाथ सखा साधक वृंद तथा अंजनगाव सुर्जी दसरा महोत्सव समिती यांनी परिश्रम घेतलेत.

८४ वर्षांचा होवो किंवा ९०, हे म्हातारं महाराष्ट्राला योग्य रस्त्यावर आणल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही : शरद पवार

फलटण दि. १४ : काही तरुण मुले हातात बोर्ड घेऊन उभे होते. त्यात माझा फोटो होता. त्यात लिहिले होते की, ८४ वर्षांचा म्हातारा. तुम्ही काही काळजी करू नका. आपल्याला लांब जायचंय, ८४ होवो की ९० होवो हा म्हातारा काही थांबत नाही. हे म्हातारं महाराष्ट्राला योग्य रस्त्यावर आणल्याशिवाय थांबत नाही, असे वक्तव्य राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अनेक जण प्रवेश करत आहेत. आज रामराजे नाईक निंबाळकर यांचे बंधू संजीवराजे निंबाळकर आणि त्यांचे सुपुत्र अनिकेत निंबाळकर यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. या कार्यक्रमातून शरद पवारांनी जोरदार हल्लाबोल केला.

शरद पवार म्हणाले की, मागे आलो होते तेव्हा काहीतरी चुकतंय का असे कार्यकर्त्यांकडे बघून वाटत होतं. मी अनेक सभा घेतल्या मला डोळ्यात बघून कळतं. आज तुमचे डोळे प्रफुल्लित आहेत. धैर्यशील मोहिते पाटील यांच्या सभेला आलो होतो तेव्हा डोळ्यात घबराट होती. माझ्या आईची श्रद्धा राजाळे येथील मंदिरात होती. आज पुन्हा एकदा महाराष्ट्र उभा करायचा आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी चळवळ झाली. त्यात फलटण अग्रेसर होते. हरिभाऊ निंबाळकर आमदार झाले. कारण महाराष्ट्राला मराठी भाषिकांचे राज्य हवं होतं. यशवंतराव चव्हाण यांना मुख्यमंत्रीपद मिळावं याचा काँग्रेसचा ठराव फलटण इथल्या मनमोहन पॅलेस येथे झाला होता. त्यामुळे महाराष्ट्र उभा करण्यामध्ये फलटणकरांचे योगदान मोठं हे कुणी विसरू शकत नाही. इथे एक जण दिसत नाहीये. परंतु त्यांची मानसिकता काय आहे हे धैर्यशील यांच्या निवडणुकीत मला कळालं. एक जण इतर दिसत नाही त्याची चिंता तुम्ही करू नका. असे वक्तव्य शरद पवार यांनी रामराजे नाईक निंबाळकर यांच्याबाबत केले. स्वतःच्या बहिणीबद्दल आस्था असतेच. मागे कधी बहीण आठवली नाही. ५ वर्ष देवेंद्र फडणवीस यांच्या हातात सत्ता होती तेव्हा बहीण दिसली नाही. लोकसभेला जेव्हा पराभव झाला तेव्हा बहीण आठवली, असे म्हणत त्यांनी लाडकी बहीण योजनेवरून महायुती सरकारवर निशाणा साधला.

बारामतीकर लय हुशार आहेत. तिथे एक बहीण उभी होती. प्रचाराला गेलो की लोक गप्प बसायचे. इतक्या वर्षाचे संबंध होते, जीवाभावाचे संबंध होते. पण बारामतीकरांनी बहिणीला पाठिंबा दिला. मला साठ वर्षात एक दिवस पण तुम्ही सुट्टी दिली नाही. मला चार वेळा तुम्ही मुख्यमंत्री केलं. महाराष्ट्राचा चेहरा बदलायची माझी नैतिक जबाबदारी आहे, असेही शरद पवार यांनी म्हटले.

स्वप्निल कुसळे यास २ कोटी रुपये तर सचिन खिलारी यास ३ कोटीचा धनादेश

मुंबई दि. १४ : पॅरिस, फ्रान्स येथे २०२४ मध्ये झालेल्या ऑलिंम्पिक स्पर्धेमध्ये पदक प्राप्त खेळाडूंना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते धनादेश आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आज खेळाडूंना सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, क्रीडा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त सुरज मांढरे उपस्थित होते.

पॅरिस, फ्रान्स येथे आयोजित करण्यात आलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेतील नेमबाजी स्पर्धेमधील ५० मीटर रायफल ३ पोझीशन या उपप्रकारामध्ये कास्य पदक प्राप्त करणाऱ्या स्वप्निल कुसळे व पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेतील मैदानी स्पर्धेमधील गोळाफेक या उपप्रकारामध्ये रौप्य पदक प्राप्त करणाऱ्या सचिन खिलारी या खेळाडूंचा व श्री.कुसळे यांच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे व श्री. खिलारी यांचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण यांना सन्मानित करण्यात आले.

(पान १ वरुन) राज्यपाल नियुक्त....

ठरवल्याची माहिती आहे.

राज्यपाल नियुक्त जागांचा गुंता

महाराष्ट्र विधानपरिषेदतील राज्यपाल नियुक्त १२ जागांचा तिढा बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे. महाविकास आघाडी सरकार असताना राज्यपालांनी या यादीच्या मंजुरीला विलंब केल्यानंतर हे प्रकरण कोर्टात गेले होते. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या आधी या जागांची नियुक्ती व्हावी, यासाठी महायुतीकडून प्रयत्न केले जात होते. या १२ जागांमध्ये भाजपला सहा, शिंदेंच्या शिवसेनेला तीन, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला तीन जागा, असा फॉर्म्युला ठरवण्यात आल्याची चर्चा होती. या १२ पैकी आता महायुती सरकारने सात जागांच्या नावांवर शिक्कामोर्तब केलं आहे.

पाहिजेत

वनिता समाज संचालित, वनिता समाज बालोद्यान प्राथमिक शाळा, उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा, राजकमल चौक, अमरावती येथे तात्पुरत्या स्वरुपात संगणक शिक्षकाचे पद व संस्था/शाळेकरिता तात्पुरत्या स्वरुपात लिपीकाचे पद खालीलप्रमाणे नियुक्त करावयाचे आहे.

अनु. क्र.	पदाचा तपशिल	संख्या	शैक्षणिक अर्हता	प्रवर्ग	वयोमर्यादा
१.	संगणक शिक्षक	०१	संगणक पदवी किंवा पदविका M.S.C.I.T.	सर्व	२१ वर्ष ते पुढे
२.	लिपीक	०१	कोणत्याही शाखेतील पदवीधर M.S.C.I.T. संगणकाचे ज्ञान व टॅली कोर्स अत्यावश्यक	सर्व	२१ वर्ष ते पुढे

१) इच्छुक उमेदवारांनी दिनांक १८/१०/२०२४ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत संगणक शिक्षक मुलाखत व दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत लिपीक पदाची मुलाखत राहील. उमेदवारांनी आवेदन पत्र व शैक्षणिक, व्यावसायिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसहित मुलाखतीकरिता स्वखर्चाने वनिता समाज संस्था, राजकमल चौक, अमरावती येथे हजर राहावे.

२) पुरुष उमेदवारांना व स्त्री उमेदवारांना अनुभवानुसार प्राधान्य देण्यात येईल.

अध्यक्ष
वनिता समाज,अमरावती.

सचिव
वनिता समाज,अमरावती.

आर.एन.आय.क्र.११४२०/५७/रजि/क्र.एन.आर./ए.टी.आय./८५/२००३, हे पत्र श्रम प्रतिष्ठान प्रा.लि. चे करीता हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक उल्हास बा. मराठे यांनी हिंदुस्थान ग्राफीस अँड प्रिंटर्स, सहकारी औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती येथे छापून दै. हिंदुस्थान कार्यालय, खापर्डे बगीचा, अमरावती येथे प्रसिद्ध केले. ● **प्रबंध संपादक** – विलास अ.मराठे ● **संपादक–** उल्हास बा. मराठे ● **मालक –** श्रम प्रतिष्ठान प्रा.लि., अमरावती●दुरध्वनी क्र. २६६०४२९,२६६६४६४,२६६००६७, २६६०५७६,२६६२७४५ ● फॅक्स क्र.–०७२१–२६६३३६०, २६६०५७६ ● **यवतमाळ कार्यालय :**दै. हिंदुस्थान, स्टेशन रोड, यवतमाळ फोन नं. : २३९६४८/२४३०